नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०५/२०२६ (रविवार)**

---

## ९० दिवस काम केल्याची खोटी प्रमाणपत्रे देऊन शासनाची दिशाभुल करून फसवणूक केल्या प्रकरणी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत २ गुन्हे नोंद

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यक्तीने (कामगाराने) बांधकाम क्षेत्रात किमान ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. यासाठी अधिकृत ठेकेदारांकडून कामगारांना प्रमाणपत्र देण्यात येते. मात्र काही ठेकेदार व ऑनलाईन सेवा केंद्र चालक यांनी प्रत्यक्षात काम न केलेल्या व्यक्तींना खोटी व बनावट ९० दिवस काम केल्याची प्रमाणपत्रे तयार करून दिल्याचे उघडकीस आले. मंडळाच्या योजनांमध्ये गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारींची दखल घेत अपर कामगार आयुक्त, नागपूर यांच्या निर्देशानुसार विशेष दक्षता पथकांची स्थापना करून विविध ठिकाणी तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेत बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे शासनाच्या योजनांचा लाभ मिळवुन शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या मोहिमेदरम्यान पोलीस स्टेशन बेला अंतर्गत बाजार चौका बेला येथील आयांश ऑनलाईन सर्व्हिस सेंटर येथे धाड टाकण्यात आली. तपासणीदरम्यान बांधकाम कामगार नोंदणीसाठी वापरण्यात येणारी कागदपत्रे जप्त करण्यात आली. चौकशी अंती काही व्यक्तींचे ९० दिवस काम केल्याची प्रमाणपत्रे बनावट असल्याचे निष्पन्न झाले. तसेच पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मांढळ येथील भोयर इंटरनेट कॅफे येथे करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान ठेकेदाराच्या सही व शिक्क्यासह कोरी ९० दिवस काम केल्याची प्रमाणपत्रे, अपूर्ण व

संशयास्पद कागदपत्रे जप्त करण्यात आली. ही कागदपत्रे बांधकाम कामगारांच्या नोंदणी प्रक्रियेत वापरण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बेला येथे आयांश ऑनलाईन सर्व्हिस सेंटर, बाजार चौक बेला चे चालक शुभम लोणारे,रा धामनगाव ता. समुद्रपुर जि. वर्धा तसेच पोलीस स्टेशन कुही येथे भोयर इंटरनेट कॅफे, मांढळ चे चालक प्रणय भोयर व ठेकेदार प्रजय विलास गजभिये दोघे रा. मांढळ ता कुही जि नागपुर यांनी आर्थिक फायद्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याने दिनांक ३०/०५/२०२६ रोजी नमुद आरोपीविरूध्द कलम ३१८(४) आणि ३३६(३) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. नागपुर ग्रामीण पोलीस सदर प्रकारणाचा सखोल तपास करीत आहेत.

## पोलीस स्टेशन पाचगाव हद्दीतील मौजा चांपा शिवारात शिवरात पायदळ पेट्रालींग आणि विशेष कोंबिग ऑपरेशन राबवुन अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर ३ गुन्हे नोंद ०५ लाख ०५ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पाचगाव :— आज दिनांक ३१/०५/२०२६ रोजी मध्यरात्री मा. श्री हर्ष ए पोद्दर, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या नेतृत्वात ,पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्यासह पाचगाव पोलीस ,दंगा नियंत्रण पथक यांनी पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत मौजा चांपा शिवर परिसरात पायदळ पेट्रोलिंग आणि विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबवून अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली आहे.

सदर कारवाईत पाचगाव पोलीसांनी अवैध दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करून घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या. आरोपी नामे नानु उर्फ ज्ञानेश्वर लालचंद पवार, वय ३५ वर्षे, रा. चांपा, ता. उमरेड , जि नागपुर याच्या सह ०२ महिला आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे नोंद केले आहेत. सदर

कारवाईत एकुण ७,८०० लिटर मोहाफुल सडवा, ६६० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले २१०० लिटर मोहाफुल रसायन सडवा प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ५,०५,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.









मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने